दिन हा सोनियाचा
सोहळा धनत्रयोदशीचा
पूजन धनलक्ष्मीचे उत्सव
कुटुंबाच्या आनंदाचा
धनत्रयोदशी

RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

सांज दैनिक बीड

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

वास्तवी २० वर्ष

● बीड ● शनिवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४

http://epaper.beedvastav.com

Email : beedvatsav@gmail.com

# ओबीसी महाएल्गार मेळाव्यातील एका चढ एक मिसाईलमुळे महाराष्ट्र निघाला ढवळून!

## ओबीसी नेत्यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण भाषणांमुळे तीन तास पब्लिकने चुळबुळ देखील केली नाही







## छगन भुजबळ कडाकडे

## मराठा समाज -आमच्यात अंतर पडले ते अंतरवलीच्या दलिंदर पाटलामुळे

बीड : प्रतिनिधी

विखे आला आणि सर्व महाराष्ट्रामध्ये विखार पसरवून गेला . गेला तर गेला पण जीआर काढला, अशी टीका मंत्री छगन भुजबळ यांनी बीडच्या महाएल्गार सभेत बोलताना केली आहे . तसेच विखे पाटील हे गरज नसताना मनोज जरांगेंकडे जातात . भाजपच्या लोकांना मला सांगायचे आहे की, तुमच्या लोकांना आवरा . मराठा समाज आणि आमच्यात अंतर पडले ते अंतर अंतरवलीच्या दरीद्री पाटलामुळे पडले आहे, अशी टीका भुजबळ यांनी केली आहे . पुढे बोलताना भुजबळ म्हणाले की, आता दुहेरी लढाई लढणार, एक न्यायालयात आणि दुसरी रस्त्यावरची ! आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही . इथे फक्त ओबीसींसाठी लढा देत आहोत . पक्षाचे काम आल्यावर आम्ही त्यासाठी लढू ! मराठा आणि कुणबी या दोन वेगळ्या जाती आहेत . हा निर्णय उच्च न्यायालयाने दिला आहे आणि सर्वोच्च न्यायालयाने देखील सांगितले आहे की, मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागास नाही . भाजपच्या सगळ्या नेत्यांना सांगतोय ओबीसींच्या ताकदीवर तुम्हाला 145 आमदार मिळाले आहेत . त्यामुळे यावर मार्ग काढा असे भुजबळ म्हणाले .

## धनगर काय वेडे वाटले? धनगर घोडे लावण्याचा तयारीत आहेत : पडळकर

● गोपीचंद पडळकर म्हणाले गोपीचंद पडळकर म्हणाले त्यांनी एक पिल्लू सोडले की धनगरांना एसटी मधून आरक्षण द्या, त्याला आमचा पाठिंबा आहे आणि तुमचा बाप तिकडे बसलाय हे तुम्हाला कळत नाही का धनगरांना ? धनगर काय वेडे वाटले का ? घोडे लावण्याचा तयारीत आहेत धनगर तुम्ही त्या तयारीला लागा . धनगर समाजाला दोन भूमिकेत जावे लागणार आहे . धनगरांच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करणे ही आमची प्राथमिकता आहे . तसेच ओबीसींच्या आरक्षणाच्या संरक्षणाची जबाबदारी सुद्धा धनगरांवर आहे . पुढे पडळकर असे म्हणाले की, आपल्यात फुट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहे . ओबीसीचे संरक्षण महत्त्वाचे आहे . आपला एकच नेता आहे तो म्हणजे छगन भुजबळ साहेब आहेत . ते जी दिशा ठरवतील ती दिशा आपली असेल . सरसकटचे प्रकरण आले आमच्या मामीला द्या, मामीच्या मामाला द्या एवढे वादळ उठले होते . आणि छगन भुजबळ साहेबांच्या नेतृत्वात आपण एकजूट झालो आणि ते वादळ मिटवले . गरीब मराठा समाजाच्या विरोधात आम्ही कधीच नाही . त्यांना वेगळे आरक्षण आहे आमचा त्यांना विरोध नाही .



## इडब्लूएस शिवाय गरिब मराठ्यांना पर्याय नाही, पण त्या बिनडोकमुळे तेही गेले : मुंडे

● आम्ही काही बोललो तर तो लगेच बोलणार पण यामध्ये मराठा समाजाचा काही फायदा नाही . ओबीसीमध्ये आल्यानंतर मराठा समाजाचे नुकसान होत आहे, इडब्ल्यूएसचे आरक्षण गेले . त्यामुळे एमपीएससी परीक्षेमध्ये त्यांना तोटा झाल्याचे नुकत्याच लागलेल्या निकालावरून स्पष्ट झाल्याचे धनंजय मुंडे म्हणाले . मराठा समाजातील गरिबातील गरीबांचा फायदा करायचा असेल तर त्यांना इडब्लूएस शिवाय पर्याय नाही . कशाला त्या बिनडोक माणसाच्या नादाला लागताय ? आपणच लय वाचाळ आहे, असे त्याने समजायचे कारण नाही . आम्हालाही आमच्या भाषेत बोलता येते . दसऱ्याचा मेळावा संपल्यानंतर त्याने 1994 चा जीआर काढावा असे म्हंटले . वंजारी समाजाचे दोन टक्के आरक्षण काढा असेही त्याने म्हंटले . पण काढायचे राहू द्या, न्यायाने द्यायचे शिका, असा टोला जरांगेंना धनंजय मुंडे यांनी लगावला . आजही मराठ्यांनी त्यांचे वेगळे आरक्षण घ्यावे, ईडब्ल्यूएसमधून घ्यावे . आमचा त्यांना विरोध नाही पण आमच्या ताटातील काही घेत असाल तर आम्ही त्याला विरोध करणार, असेही मुंडे म्हणाले .



## अधिकार की लढाई में निमंत्रण नही भेजा करते, हमारे हक्क पर आंच आये तो टकराना जरुरी है!

● ओबीसी नेते प्रा लक्ष्मण हाके म्हणाले की, महाएल्गार सभेत बोलताना छगन भुजबळ म्हणाले अनेकांना या सभेचे निमंत्रण दिले नाही म्हणून अनेक जण नाराज आहेत मी त्यांना सांगू इच्छितो, "अधिकार की लढाई में निमंत्रण नही भेजा करते, जिनका जमीर जिंदा हैं वो खुद समर्थन में आ जाते हैं, हमारे हक पर जहाँ आंच आये तो टकराना जरुरी हैं !" मी तुम्हाला सांगू इच्छितो आपल्या सभेत काही लोक घुसवले जाण्याची शक्यता आहे . मी असेही ऐकले आहे की, काही लोक सुतळी बॉम्ब घेऊन आले आहेत ते काहीतरी गडबड करतील . त्यांना तिथेच दाबायचं आणि गुपचूप पोलिसांच्या हवाली करायचं . हाके पुढे म्हणाले, हा जीआर म्हणजेच मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसीमध्ये घुसवण्याचा प्रयत्न आहे . माझी तुम्हाला हात जोडून कळकळीची विनंती आहे, एका चौथी नापास माणसाच्या सांगण्यावरून या महाराष्ट्रातल्या ओबीसींच्या आरक्षणात माती कालवण्याचे काम इथल्या लोकनियुक्त सरकारकडून झाले आहे . हा जरांगे कोणावर टीका करतो छगन भुजबळ साहेबांवर करतो, धनंजय मुंडेंवर करतो . हा चौथी नापास गडी मुख्यमंत्र्यांची आई माय काढणारा हा माणूस . ज्या लोकांनी आमच्या आरक्षणाला विरोध केला त्यांना आम्ही घरी बसवले आहे आणि यापुढेही घरी बसवू .

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात आजही लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणीला महत्व!

➤ पैठण : सर्जेराव खडसन

आधुनिक युगात तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले असले तरी धार्मिक रूढी, परंपरा, संस्कृती या गोष्टींचे कोणतेही महत्त्व कमी होताना दिसत नाही . त्यातील एक चालत आलेली जुनी परंपरा म्हणजे दिपावली सणात धनत्रयोदशीला नवीन केरसुणी अर्थात लक्ष्मीची खरेदी करून लक्ष्मीपूजनच्या दिवशी लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणीचे पूजन करणे ही एक जुनी परंपरा आहे .या केरसुणीची खरेदी करण्यासाठी नागरिकांनी शहरातील विविध दुकाने तसेच आठवडे बाजारात खरेदी करण्यासाठी गर्दी केलेली पहावयास मिळाली .

वर्षातील सर्वात मोठा व महत्वाचा सण



असलेला दीपावली हा सण अवघ्या चार ते पाच दिवसांवर येऊन ठेपला आहे . दीपावली सण मोठया आनंदात साजरा करताना सर्वजण या सणाच्या निमित्ताने कुटुंबातील लहान थोरापासून ते वृद्धांपर्यंत घरातील सर्व सदस्यांना नवीन कपडे, घरावर लावण्यासाठी आकाश कंदील, ● पान २ वर . . .

## धुळे नप. निवडणुकीसाठी उबाठा शिवसेना आढावा बैठक संपन्न

### नव्या उमेदवारांना संधी तर कार्यकर्त्यांना तयारीचे आवाहन!



➤ धुळे : उमाकांत अहिरराव

आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ( ठाकरे गट ) तर्फे महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली . या बैठकीत स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी निवडणुकीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली . जिल्हाप्रमुख अतुलभाऊ सोनवणे यांनी बैठकीस मार्गदर्शन करताना आगामी निवडणुकीत पक्षाचे बळ वाढविण्यासाठी एकजूट आणि संघटितपणे काम करण्याचे आवाहन केले . बैठकीत जास्तीत जास्त नगरपरिषद जागा ठाकरे गट किंवा महायुतीच्या खात्यात आणण्यासाठी नियोजन आणि रणनिती यावर सखोल चर्चा झाली . अतुलभाऊ सोनवणे म्हणाले की, "नवीन ऊर्जेने आणि ● पान २ वर . . .

## लग्नाचे आमिष दाखवून केला अत्याचार

### आरोपी विरुद्ध पोस्कोचा गुन्हा नोंद




➤ केज : प्रतिनिधी

केज तालुक्यातील एका खेडेगावातील अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तब्बल ९ वर्षे पीडितेवर अत्याचार केल्या प्रकरणी नराधमा विरुद्ध केज पोलिसात पोस्को अंतर्गत गुन्हा नोंद झाला आहे . केज तालुक्यातील एका खेडेगावातील अल्पवायीन मुलीवर दि .२० फेब्रुवारी २०१४ ते दि . १० हे फेब्रुवारी २०२३ दरम्यान पीडिता ही अल्पवयीन आसताना तीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या सोबत वारंवार शारीरिक संबंध करून तिच्यावर अत्याचार केल्या प्रकरणी बुधवारी रात्री ९-३० वाजता केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आसून पुढील तपास सहाय्यक पोलीस अधीक्षक व्यंकटराम हे करीत आहेत .

## सुकळी येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी संगणमत करून 15 व्या वित्त आयोगाच्या कामात लाखो रुपयाचा केला भ्रष्टाचार!

### ➤ खोटी बिले दाखवून निधी हडप करणाऱ्या ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत- अमर गायकवाड

➤ केज : प्रतिनिधी

सुकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक व सरपंच यांनी संगणमत करून १५ व्या वित्त आयोगाच्या कामात लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला असून खोटी बिले दाखवून निधी हडप करणाऱ्या ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत अशा आशयाचे लेखी निवेदन केज तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना अमर गायकवाड यांनी दिले आहे .

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सन २०२३ मध्ये सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचे तत्कालीन ग्रामसेवक पवार व सरपंच नितीन गायकवाड यांनी मिळून १४ व्या व१५ वित्त आयोगामध्ये तब्बल साडेआठ लाख रुपयाचा भ्रष्टाचार केला होता . परंतु शासनाने त्यावर कोणतेच कारवाई केलेली नाही त्यानंतर सन २०२३ मध्ये ग्रामविकास अधिकारी एस .एम . राऊत यांनी पदभार घेतला, त्यानंतर त्यांनी सुद्धा सरपंच यांच्या सोबत संगणमत करत पंधराव्या वित्त आयोगामध्ये अद्यापही एकही रुपया खर्च न करता तब्बल १३ लाख २६ हजार रुपये एवढा मोठा घोटाळा केलेला आहे . यामध्ये पवार ग्रामविकास अधिकारी असताना ईश्वरी एंटरप्राइजेस या गुत्तेदारासच सर्व टेंडर देऊन तब्बल ८ लाख ५० हजार रुपयांचा घोटाळा केला आहे . त्यानंतर ग्रामविकास अधिकारी एस .एम .राऊत यांनीही ईश्वरी एंटरप्राइजेस या एकाच गुत्तेदारास काम देऊन सदरचा सर्व घोटाळा केलेला आहे .




दिनांक २९ मे २०२३ रोजी आर .ओ . शेड १ लाख ६१ हजार ४५४ रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी संगणक संच ८० हजार रुपये, २९ मे २०२३ रोजी सौर पथ दिवे४० हजार ३६४ रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी टीआयसी खरेदी१० हजार रुपये, दिनांक १९ जून २०२३ रोजी नाली बांधकाम१ लाख ५९ हजार रुपये, दिनांक व खरेदी केलेल्या वस्तूंची आणि काम केलेले ची उपलब्ध मजकूर नाही परंतु एकूण खरेदी २ लाख ४८ हजार ११८ रुपये, दिनांक व खरेदी अथवा काम केलेल्यांची नाव उपलब्ध नसून एकूण खरेदी१७ लाख ३६ हजार ४६ रुपये, दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ आर ओ प्लांट२७ हजार ३४० रुपये, दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी कचराकुंडी८० हजार ७२७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी पाईपलाईन व विद्युत पंप८४ हजार ५४७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी स्पोर्ट साहित्य खरेदी२१ हजार ५२७ रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२५ रोजी इलेक्ट्रिकलसिटी बिल,इंटरनेट बिल, प्रिंटर चार्जेस २१ हजार ५२६ रुपये, दिनांक ४ मार्च २०२५ रोजी गणराज मोटार दुरुस्ती ९ हजार ९९० रुपये, दिनांक २ एप्रिल २०२४ रोजी सदस्य भत्ता ३० हजार रुपये, दिनांक २९ मे २०२३ रोजी अंगणवाडी खेळणी२० हजार रुपये, दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ सॅनिटरी मशीन १४ हजार २९१ रुपये, ● पान २ वर . . .

## चिंचोली लिंबाजी आठवडी बाजारात चोरांचे पिशोर पोलीसांना खुले आव्हान

➤ चिंचोली लिंबाजी : सचिन गुरव

महिलेचे बाजाराच्या पिशवीतून पाच हजार रुपयांच्या रोख रकमेसह सोन्याच्या अन्य वस्तू गायब कलल्या आहेत . कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथे शुक्रवारी आठवडी बाजार असतो . जिल्ह्यातला सगळ्यात मोठा बाजार म्हणून चिंचोली लिंबाजी या बाजाराच्या गावाची ओळख आहे . दिवाळीचा बाजार भरलेला असताना आज पाच वाजून पाच मिनिटाला छाया अनिल बावस्कर या नेहमीसारख्या आठवडी बाजारात बाजार करत असताना चोरट्याने त्यांच्या बाजाराच्या पिशवीवर डल्ला मारत सोन्याच्या वस्तू व इतर रक्कम हडप केल्याची माहिती मिळाली .

प्रतिनिधींनी बावस्कर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की बाजाराच्या पिशवीत्व हातात पैसे असताना अचानकपणे पिशवीतून सोन्याच्या वस्तू व पैसे गायब झाल्याचे सांगितले तर चिंचोली आठवडी बाजारात नेहमी चोरीचे सत्र सुरु आहे मात्र पिशोर पोलिसांचे जाणून बुजून दुर्लक्ष असल्याचे समजले जाते दुसरी घटना की बाजारातून दोन मोबाईल चोरीला गेल्याची ही घडलेली आहे . सर्वसामान्य नागरिकासह व्यापाऱ्यांमध्ये ● पान २ वर . . .




## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# रोजगाराच्या गप्पा, पण नोकऱ्याच नाहीत



लोकसभा निवडणुकात मतदारांना प्रलोभित करण्यासाठी सत्ताधारी भारतीय जनता पक्षासह सर्व राजकीय पक्षांनी केंद्राची सत्ता मिळाल्यास दरवर्षी कोट्यवधी सुशिक्षित बेकारांना सरकारी नोकऱ्या आणि स्वयंरोजगार उपलब्ध करून द्यायचे भरघोस आश्वासन आपल्या जाहीरनाम्याद्वारे दिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह सर्वच पक्षांचे नेते जाहीर प्रचार सभातून आपला पक्ष देशातल्या बेरोजगारीचे निर्मूलन करण्यास वचनबध्द असल्याच्या आश्वासनाचाही पाऊस पाडत असले तरी प्रत्यक्षात मात्र देशातल्या सुशिक्षित बेकारांची बेरोजगाराची समस्या दिवसेंदिवस अधिकच गंभीर आणि जटील होत असल्याचे दाहक वास्तव आहे. देशात कोट्यवधी सुशिक्षित युवती युवकांना त्यांच्या पात्रतेच्या तर सोडाच पण उदरनिर्वाह चालेल अशा वेतनाच्या नोकऱ्याही मिळत नाहीत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातले दोन तीन लाख अभियंत्यांना दरमहा लाख दीड लाख पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत.

खाजगी उद्योग क्षेत्रातही काही टक्के सुशिक्षितांना चांगल्या वेतनाच्या नोकऱ्या आहेत पण बी.ई., बी.टेक., एम.बी.ए., यासह उच्च पदव्या घेतलेल्या कोट्यवधी सुशिक्षित युवक- युवतींची नोकऱ्या मिळवण्यासाठीची वर्षोनुवर्षे सुरू असलेली ससेहोलपट, होरपळ थांबलेली नाही. राज्य आणि केंद्र सरकारच्या क्षेत्रातले नोकऱ्यांचे प्रमाण अत्यल्प असले तरीही सरकारी नोकऱ्यात मिळणारे कायमस्वरूपी वेतन, महागाई भत्ता आणि अन्य सवलती, वय, सुशिक्षित युवक-युवतींना सरकारी नोकऱ्या सुरक्षिततेच्या वाटतात. परिणामी अगदी सरकारी नोकऱ्याच्या विविध खात्यात शंभर-दोनशेच्या पदभरतीसाठी जाहिरात प्रसिध्द होताच सुशिक्षित बेकारांचे त्या पदासाठी हजारोंच्या संख्येने अर्ज दाखल होतात. त्याची प्रचिती म्हणजे महाराष्ट्र पोलीस दलातील १७,४७१ पदाच्या भरतीसाठी सुरू झालेली प्रक्रिया!

महाराष्ट्र पोलीस दलातल्या १७,४७१ पदाच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द होताच अर्ज भरण्याच्या शेवटच्या मुदतीपर्यंत म्हणजे १५ एप्रिलपर्यंत थोडे थोडके नव्हे तर १७, ७६,००० सुशिक्षित युवक युवतींचे अर्ज दाखल झाले आहेत. पोलिसांच्या पदासाठी शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण असली तरीही प्रत्यक्षात मात्र पदवीधर, द्विपदवीधर आणि उच्चशिक्षित युवक-युवतींनी या पदाच्या भरतीसाठी दाखल केलेल्या अर्जाची टक्केवारी ४० आहे, हे धक्कादायक होय. या पदासाठी अर्ज दाखल करणाऱ्या बी.ई., बी.टेक.,बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी., एम.बी.ए., एलएल.बी. अशा उच्चशिक्षित युवक-युवतींनी अर्ज दाखल केले आहेत.

या भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या युवक- युवतींची आधी मैदानी खेळ आणि शारीरिक क्षमतेची परीक्षा राज्यातल्या जिल्ह्यातल्या केंद्रात होईल आणि त्यानंतर लेखी परीक्षा होईल. सुशिक्षित बेकारांची ही समस्या साऱ्या देशभरात अत्यंत गंभीर होत आहे. चार महिन्या पूर्वी उत्तर प्रदेशातल्या ३ हजार पदांच्या पो- लीस भरतीसाठी ५० लाख सुशिक्षित बेकारांनी परीक्षा दिली होती. त्या परीक्षेत पेपर फुटल्याचे निष्पन्न झाल्याने ती रद्द झाली. आता पुन्हा एकदा त्या सुशिक्षित बेकारांना नव्याने परीक्षा द्यावी लागेल. एवढ्या प्रचंड संख्येने अर्ज दाखल करणाऱ्या युवकांची परीक्षा घेताना पेपर फुटणार नाहीत, याचीही दक्षता राज्य सरकारला घ्यावी लागते अन्यथा परीक्षा रद्द झाल्याने पुन्हा सुशिक्षित बेकारांची ससेहोलपट होते. सुशिक्षित बेकारीची ही वाढती समस्या राष्ट्र आणि समाजासमोरचे सर्वात मोठे आव्हान आहे

# आपले मन आजारी आहे का?

**मित्रांनो** आपण डॉक्टर कडे कधी जातो? आपलं शरीर काही कारणामुळे आजारी पडते तेव्हा ना! आपल्या सर्वांनाच माहित आहे की जसे वातावरनात बदल झाला किंवा चुकीच्या सवयी, चुकीचा आहार व व्यायामाचा अभाव काही साथींचे व संपर्कजन्य आजार सुद्धा दिसून येतात. मग आपण व आपल्या कुटुंबातील व्यक्ती जर आजारी पडली तेव्हा आपण हॉस्पिटलमध्ये जातो जेव्हा आपल्याला त्रास होतो आपल्या शारीरिक वेदना असाह्य होतात. जसे की डोकं जड होणे, पित्त होणे, अर्धशिशी होने, सर्दी-ताप, जुलाब, कंबर दुखी, पाठ दुखी, गुडघेदुखी, हात हातपाय गळून, जाणे चक्कर येणे बीपी, शुगर, अस्थमा, पोटाचे आजार असे अनेक शारीरिक लक्षणे व्यक्तीमध्ये दिसून येतात. तेव्हा आपण लगेच हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांकडे जातो. योग्य तो औषधोपचार घेतो आराम घेतो सांगितल्याप्रमाणे आहार घेतो. दिलेली ट्रीटमेंट व्यवस्थित पार पाडतो.

याच पद्धतीने आपले मन आजारी पडते ही संकल्पनाच आपल्याला रुजत नाही. आपलं मन कुठे आजारी पडत असते का? कारण आपण सहसा आपल्या मनाचा आपण कधी विचारच केलेला नाही कारण आत्तापर्यंत शारीरिक आजाराचे हे मानसिकतेचे प्रतिबिंबच आहे. हे आपल्याला माहित नसावे किंवा आपल्या समाजामध्ये व्यक्ती हे मान्यच करत नाही की माझं मन आजारी आहे. आपलं मन जेव्हा आजारी पडते तेव्हा आपोआपच व्यक्तीमध्ये खालील लक्षणे जाणवतात. अगदी मोठे मोठे आजार सुद्धा याच मानसिकतेचे प्रतीक आहेत. आपले अस्तित्व निर्माण करत असताना जगण्याची पद्धती, विचारसरणी, आपली दिनचर्या, आपण दुसऱ्याचा कशाप्रकारे विचार करतो या सगळ्या गोष्टी जर नकारात्मक व चुकीच्या असतील तर आपल्याला मनाचे आजार नक्कीच उद्भवतात. मन जेव्हा आजारी पडते तेव्हा मनामध्ये सतत नकारात्मक विचार येऊन सतत, आळस येणे, उदास वाटणे, अस्वस्थ व बेचैनी होणे दैनंदिन कामामध्ये मन न लागणे योग्य निर्णय घेताना न येणे. जेवणाची इच्छा असूनही

**आपलं मन जेव्हा आजारी पडते तेव्हा आपोआपच व्यक्तीमध्ये खालील लक्षणे जाणवतात. अगदी मोठे मोठे आजार सुद्धा याच मानसिकतेचे प्रतीक आहेत. आपले अस्तित्व निर्माण करत असताना जगण्याची पद्धती, विचारसरणी, आपली दिनचर्या, आपण दुसऱ्याचा कशाप्रकारे विचार करतो या सगळ्या गोष्टी जर नकारात्मक व चुकीच्या असतील तर आपल्याला मनाचे आजार नक्कीच उद्भवतात.**



विशेष




●मनीषा बिक्कड (घुले), समुपदेशक
मो. 9545440471/ 9370274675


जेवण न जाने, झोपेच्या तक्रारी, वारंवार बाथरूमला जाणे किंवा जावेसे वाटणे, टेन्शन आलं की भीती वाटते, पोटात गोळा येतो, बारीक ताप आल्यासारखा वाटतो, छातीत जळजळ होते, पोटामध्ये गॅसेस किंवा गोळा आल्यासारखं होणे अति राग राग करणे, सतत चिडचिड करणे, सतत भावनिक होणे, पुन्हा पुन्हा हार्टबीट वाढणे, श्वासस्वच्छ वास वाढतो. थरकाप सुरू होणे, हातापायाला मुंग्या येणे, स्नायू आखणे, मान खांदे जड पडणे, तोंड कोरडे पडणे, गोड खावेसे वाटणे, सतत झोपून राहावंसं वाटणे, कोणत्या कामामध्ये उत्साह न वाटणे, सतत रडू येणे, टेन्शनमध्ये जीवन जगणे, अपराधी आणि एकट वाटणे, नशिबाला दोष देणे, त्रासाच्या वेदना सहन होत नसल्याने व्यसन आणि आत्महत्या सारखे विचार येणे, वरीलक्षणापैकी सहा ते आठ लक्षण जर व्यक्तीमध्ये दिसून येत असतील तर आपले मन आजारी पडलेले आहे. त्याला योग्य उपचाराची गरज आहे म्हणजेच आपलं समुपदेशन करण्याची गरज आहे असे एक ना अनेक लक्षणे मन आजारी पडल्यावर दिसून येत असतात. या लक्षणांची उच्च पातळी झाली तर! गंभीर मानसिक व शारीरिक आजाराला तोंड द्यावे लागते. जसे शारीरिक आजारावर लगेच आपण उपचार करतो तसेच मनावरही उपचार करणे गरजेचे आहे तेव्हाच आपले मन शारीरिक व मानसिक आजारांना आपल्या जवळ येऊ देणार नाही. अशाच प्रकारच्या विविध विषयावरील माहितीसाठी व समुपदेशनासाठी संपर्क साधू शकता. (लेखीका मेंदू विज्ञानावर आधारित मानसशास्त्रीय उपचारक आहेत)

# काळजी घ्या...! उन्हाळ्यातला थंडी, ताप!

**गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून उष्माही वाढला आहे. यामुळे काही ठिकाणी उष्णतेची लाट आली असून थंडी तापाचे रुग्ण वाढत आहेत. भारतात प्रामुख्याने फ्लूची अनेक कारणे आहेत जसे की उष्णतेची लाट, अयोग्य आहार किंवा संसर्गाची साथ. सध्या उन्हाळा सुरू असल्याने या उन्हाळी फ्लूची नेमकी लक्षणे आणि उपचार कोणते ये बघूया.**

## फ्लू लक्षणे

१ उन्हाळ्यातील फ्लूची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे ताप, खोकला, डोकेदुखी, शरीरात पेटके येणे, नाक वाहणे, घसा खवखवणे, उलट्या आणि जुलाब. हिवाळ्यातील फ्लूप्रमाणे, उन्हाळ्यातील फ्लू हा देखील इन्फ्लूएंझा विषाणूमुळे होतो. हा विषाणू डिसेंबर ते फेब्रुवारी या महिन्यांमध्ये सर्वाधिक सक्रिय असतो, परंतु जेव्हा उष्णता वाढते तेव्हा त्रास होऊ शकतो. वाहणारे नाक, डोकेदुखी, थंडी वाजून येणे, ताप आणि अंगदुखी ही त्याची मुख्य लक्षणे आहेत. पण फ्लूवर वेळेवर उपचार न केल्यास त्याचे रूपांतर न्यूमोनियामध्ये होते. हा एक गंभीर आजार आहे, ज्यामुळे एखाद्या व्यक्तीचा मृत्यू देखील होऊ शकतो.

२ हे फ्लू विषाणूच्या संसर्गामुळे किंवा फ्लू विषाणू आणि बॅक्टेरियाच्या सह-संसर्गामुळे देखील होऊ शकते. त्याची सुरुवातीची लक्षणे सामान्य फ्लूसारखीच असतात. यामध्ये ताप, सर्दी आणि डोकेदुखीचा समावेश आहे. याशिवाय हिरव्या किंवा पिवळ्या कफसह खोकला, श्वासोच्छवासाचा त्रास आणि तीव्र छातीत दुखणे देखील समाविष्ट आहे. तसेच न्यूमोनियाप्रमाणे, ब्रॉन्कायटिस कधीकधी फ्लूच्या विषाणूंमुळे होऊ शकतो. त्याच्या लक्षणांमध्ये खोकला, ताप, थंडी वाजून येणे आणि थकवा यांचा समावेश होतो.



## सकस आहार घ्या.

जीवनसत्त्वे लिंबूवर्गीय फळे, हिरव्या पालेभाज्या, सिजनल भाज्या, भरपूर प्रथिनेयुक्त पदार्थ जसे मांस आणि अंडी आणि शेवटी भरपूर फळे खा. स्वतःला तंदुरुस्त आणि निरोगी ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा. सक्रिय, तंदुरुस्त आणि निरोगी शरीर उन्हाळ्यात किंवा हिवाळ्यात कोणत्याही प्रकारच्या संसर्गाशी लढण्यास सक्षम असते. रोगप्रतिकारशक्ती ही केवळ आहार आणि व्यायामावर अवलंबून नाही, तर तुम्हाला रात्रीची शांत झोप देखील मिळणे आवश्यक आहे. रात्री चांगली झोप घ्या.

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात

●पान १ वरून... विविध प्रकारच्या पणत्या, फटाके सोबतच सध्या विविध साहित्य खरेदी करण्याच्या लगबगी सोबतच ग्रामीण व शहरी भागातील नागरिक दीपावली या सणात लक्ष्मी पूजनाच्या दिवशी लक्ष्मी अर्थात केरसुणीला परंपरेनुसार पूजेचा पहिला मान असल्याने पैठण शहरातील विविधठिकाणा वरील दुकाने तसेच आठवडे बाजारात जागोजागी या लक्ष्मीचे प्रतीक असलेल्या केरसुणीचे दुकानावर या लक्ष्मीची खरेदी करण्यासाठी गर्दी झालेली पहावयास मिळाल्याने आधुनिक काळात आजही ही केरसुणी बाजारात आपले अस्तित्व टिकवुन ठेवले असल्याने या सणात तिचे किती महत्व आहे हे यावरूनच कळते.

दिपावली सणात नवीन केरसुणी खरेदी करणे आणि लक्ष्मी पूजनाला तिची पूजा करणे ही एक जुनी परंपरा आहे, जी आजही मोठ्या प्रमाणात पाळली जाते. त्यामुळे आधुनिक काळात तंत्रज्ञान कितीही प्रगत झाले असले तरी या दीपावली सणात केरसुनीचे अर्थात लक्ष्मीचे पूजन करणे या परंपरेचे महत्त्व कमी झालेले आजही दिसत नाही. असे तीन पिढ्यांपासून केरसुणी तयार करून विक्री करणारे राहुलनगर येथील विक्रेते हरिभाऊ घोरपडे कुटुंबीयांनी सांगितले.

## धुळे नप. निवडणुकीसाठी उबाठा शिवसेना आढावा बैठक संपन्न

नव्या विचारसरणीने पक्ष मजबूत करण्यासाठी तरुण आणि नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार आहे. कार्यकर्त्यांनी आता आपल्या तयारीला लागावे, संघटनेच्या ताकदीवरच विजय निश्चित होतो. या प्रसंगी जिल्हा समन्वयक किशोर आप्पा वाघ, महिला आघाडी जिल्हा संघटिका अलकाताई जाधव, शहर प्रमुख महिला अर्चनाताई चव्हाण, तालुकाप्रमुख तुषार गवळी, माजी जिल्हाप्रमुख भूपेशभाई शहा, तालुका समन्वयक नानुभाव पगारे, उपतालुकाप्रमुख रमेशभाऊ, मनोज खैरनार, हर्षल सोनवणे, अमोल क्षीरसागर, अतुल चौधरी, युवा सेना शहरप्रमुख चिंतामण ठाकरे, मयूर नांद्रे, दत्तुभाऊ गुरव, माजी तालुकाप्रमुख राकेशभाऊ जैन, जितुभाऊ जैन, भाऊसाहेब पगारे, खुशाल वाडेकर यांसह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. बैठकीदरम्यान पदाधिकाऱ्यांनी स्थानिक प्रश्न, जनतेचा विश्वास संपादन करण्याच्या दिशा आणि प्रचार रणनीती यावरही विचारमंथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केले तर शेवटी शिवसेना प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत सर्व कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी सज्ज राहण्याची ग्वाही दिली.

## चोरांचे पिशोर पोलीसांना खुले आव्हान

शुक्रवारी घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे पिशोर पोलीस ठाण्याचे बीट जमादारासह एक कर्मचारी बाजारात ग्रस्त घालताना दिसून आला चिंचोली आठवडी बाजारात संशयित म्हणून एका तरुणाला पोलिसांनी गाठले त्याचा फोनचा पॅटर्न उघडत नसल्याने त्याच्यावर* *संशय आल्याचे कळले व त्याला पोलिसांनी पोलीस खाक्या दाखवल्या पण तो संशयित चोर नसल्याचे आढळून आले त्याचे कुटुंब व चिंचोली आठवडी बाजारात आलेल्या पिशोर पोलिसांची बाचाबाची झाली नंतर ग्रामपंचायत येथे मध्यस्थी करून प्रकरण मिटवले गेले पण संशयित तरुणाचे खिशातले दहा हजार रुपये गेल्याचे त्याच्या कुटुंबीयांनी सांगितले.

## सुकळी येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी संगणमत करून

दिनांक २९ एप्रिल २०२४ रोजी इन्स्टॉलेशन ऑफ सॅनिटरी वेंडिंग२८ हजार ५८२ रुपये, दिनांक ४ मे २०२४ रोजी आर ओ प्लांट बसवणे१३ हजार ६७० रुपये, दिनांक ४ मे २०२४ रोजी सॅनिटरी मशीन ४७ हजार ६३ रुपयांची वरील नमूद सर्व कामे झालेली अथवा करण्यात आलेली नाहीत. तसेच ग्रामपंचायत सदस्य यांना सुद्धा कोणत्याच प्रकारचा भत्ता देण्यात आलेला नाही. सन २०२३ मध्ये अंगणवाडी करिता खेळणी यासाठी २० हजार रुपये खर्च करून खेळणी आणल्याचे दाखवण्यात आलेले आहे, परंतु याबाबत अंगणवाडी सेविका यांना लेखी पत्र देऊन विचारणा केली असता त्यांनी लेखी पत्राद्वारे अशा प्रकारची खेळणी अंगणवाडीस कधीच मिळालेले नाहीत असे स्पष्ट लिहून दिलेले आहे. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांनी देखील सॅनिटायझर मशीन खरेदीच्या नावाखाली तीन वेळा बिले दाखवून पैसे उचलण्यात आले आहेत. याबाबत देखील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक यांना याबाबत पत्रव्यवहार करून विचारणा केली असता त्यांनी ही या गोष्टी स्पष्ट नकार दिला आहे तसेच त्यांच्या असे मत आहे की, सॅनिटरी मशीन ही इयत्ता आठवी व त्यावरील शाळेतील मुलींच्या वापरासाठी आवश्यक असते आमच्याकडे इयत्ता चौथी पर्यंत शाळा आहे त्यामुळे आम्हाला सॅनिटरी मशीनची आवश्यकताच भासत नाही व अशी कोणत्या प्रकारची सॅनेटरी मशीन आम्हाला मिळालेली नाही. तसेच दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी चे पाईपलाईन व विद्युत पंप यासाठी ८४ हजार ५४७ रुपयाचे बिल खर्च आलेले आहे परंतु सन२०२५ मध्ये जल जीवन योजनेमध्ये सुकळी ग्रामपंचायत साठी ८ लाख ५० हजार रुपये खर्च करून जलजीवन विभागाने गावासाठी पाण्याची सोय केलेली आहे व दोन पाच एचपी च्या विद्युत मोटर पुरवलेल्या आहेत. जर ग्रामपंचायतने८० हजार रुपये खर्च करून संगणक संच आणला होता तर हे चार्जेस कोणाला दिले. तसेच ही सर्व खरेदी २०२३ व २०२४ मध्ये ठराविक एका महिन्यामध्येच करण्यात आलेली आहे तसेच ही विविध कामे एकाच ईश्वर एंटरप्राइजेस नावाच्या कंपनीला देण्यात आलेले आहेत असे प्रकारे पंधराव्या वित्त आयोगामध्ये एक रुपयाही खर्च न करता खोटी बिले दाखवून ग्रामविकास अधिकारी व सरपंच यांनी मिळून संपूर्ण निधी हडप केला आहे असे लेखी निवेदनात अमर गायकवाड यांनी म्हटले आहे व अशा आशयाची लेखी निवेदन तहसीलदार केज, गट विकास अधिकारी पंचायत समिती केज, आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना निवेदनाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत.


सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922


# अखेर भीती खरी ठरलीच : पात्रुड–लऊळ रस्त्यावर अपघातात महिलेचा मृत्यू

## खासदार, आमदार साहेब तुम्ही दोघे "त्या" कुटुंबाची जबाबदारी घेणार का?

**असंख्य बातम्या येऊनही मुर्दाड प्रशासनाने गंभीर दखल न घेतल्याने निष्पाप माऊलीला आपले प्राण गमवावे लागले; याची जबाबदारी घेणार कोण?**

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

पात्रुड–लऊळ या अवघ्या चार किलोमीटरच्या रस्त्यावरील खड्डे अखेर एका निष्पाप जीवाचे बळी ठरले. रविवारी सकाळी दुचाकीवरून जात असताना रस्त्यातील खोल खड्ड्यात तोल गेल्याने झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वीच या रस्त्याच्या दयनीय अवस्थेबाबत वृत्तपत्रातून इशारा देण्यात आला होता, परंतु प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी त्याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर भीती खरी ठरली आहे.


नाजेमा हुसेन शेख (मयत)

मिळालेल्या माहितीनुसार, मयत नाजेमा हुसेन शेख ह्या पात्रुड गावच्या महिला रहिवासी असून रोजच्या प्रमाणे त्या आपल्या कामासाठी दुचाकीवरून निघाल्या होत्या रस्त्यातील खोल खड्डा चुकवताना दुचाकीस्वराचा तोल गेल्याने त्या खाली पडल्या आणि गंभीर जखमी होऊन कोमात गेल्या; स्थानिक नागरिकांनी तातडीने त्याना उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेले परंतु तोपर्यंत त्या कोमामध्ये गेल्या उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पात्रुड–लऊळ हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित आहे. पावसाळ्यानंतर रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. काही दिवसांपूर्वी या रस्त्याबाबत "प्रवाशांचा कर्दनकाळ ठरत असलेला मार्ग" अशी बातमी





स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या वेळी नागरिकांनी प्रशासनास तसेच जनप्रतिनिधींना वेळेत उपाययोजना करण्याचे आवाहन केले होते, पण कुणीच दखल घेतली नाही. परिणामी आज एका कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त झाला आहे.

स्थानिक नागरिकांमध्ये आता तीव्र संतापाची लाट आहे. "फक्त निवडणुकीच्या काळात या रस्त्याच्या डांबरीकरणाची आश्वासने देणारे आमदार आणि खासदार आता कुठे आहेत? झालेल्या मृत्यूची जबाबदारी कोण घेणार?" असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शेतकरी आणि युवकांनी अनेक वेळा लेखी मागण्या केल्या होत्या, पण सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनही काहीच हालचाल झाली नाही.

घटनेनंतर संतप्त नागरिकांनी सोमवारी सकाळी या रस्त्यावर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. प्रशासनाने तात्काळ लक्ष न दिल्यास पुढील काळात मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

दरम्यान, मृत तरुणाच्या कुटुंबीयांवर शोककळा पसरली असून गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# 'अंधरा कायम रहे'

## माजलगाव शहरात 'महावितरण' चा अनोखा प्रयोग; मुख्य रस्त्यांवरील पथदिवे बंद



➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

दिवाळी सणानिमित्त खरेदीसाठी रस्त्यावर प्रचंड गर्दी होत असून, रस्त्यावरील सर्व पथदिवे मात्र बंद अवस्थेत आहेत, त्यामुळे चोरीच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. हिंदूबांधवांचा सण असतानादेखील नगर परिषद प्रशासनाने पथदिवे सुरू करण्यासाठी काहीही प्रयत्न न केल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

### लाईट बंद; बाजारात गर्दी

हिंदू धर्मबांधवांचा दिवाळी हा वर्षातील सर्वात मोठा सण आहे. या सणाच्या निमित्ताने घराघरांत नवीन कपडे, वाहने, वस्तूंची खरेदी करण्यात येते. त्यासाठी महिला, पुरुष कुटुंबासह खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत येतात .बहुतांश लोक सायंकाळी घराबाहेर पडण्यास पसंती देतात, तर ग्रामीण भागातील लोक दिवसभर शहरात थांबून खरेदी करतात. शहराचा मुख्य रस्ता आंबेडकर चौक ते शिवाजी चौक, बसस्थानक, संभाजी चौक हा आहे.

### पथदिवे मागील अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत

या रस्त्यावरअसलेले पथदिवे मात्र मागील अनेक महिन्यांपासून बंद अवस्थेत आहेत. महामार्ग प्राधिकरण यांनी हे पथदिवे नगर परिषद यांच्याकडे हस्तांतर केले आहेत. मात्र, तरीही अनेक महिन्यांपासून ते बंद आहेत, ते चालू करण्यास नगर परिषद टाळाटाळ का करत आहे, हे कळण्यास मार्ग नाही. आता दिवाळी खरेदीसाठी रात्री उशिरापर्यंत बाजारपेठेत गर्दी आहे, मात्र रस्त्यावर अंधार असल्याने त्याचा फायदा घेऊन महिलांच्या अंगावरील दागिने व मौल्यवान वस्तू, खिशातील पैसे, पर्स पळवणे अशा गुन्हेगारी घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी होत आहे.

# पूरग्रस्त सांडस चिंचोलीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त ठरलेल्या सांडस चिंचोली गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत सदस्य भिम दशरथ थोरात यांनी शैक्षणिक साहित्य वाटप केले.

काही दिवसांपूर्वी आलेल्या पुरामुळे गावाचा संपर्क तुटला होता, अनेक घरांत पाणी शिरले होते, आणि नागरिकांना भयानक पूरपरिस्थितीला सामोरे जावे लागले. या संकटाच्या काळात अनेक दानशूर व्यक्तींनी सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचे दर्शन घडवत पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला.

त्याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी एक छोटा पण अर्थपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. भिम दशरथ थोरात सर, बंडू पवार सर, आणि सुखदेव माने सर यांनी "ही फुलं न फुलाची पाकळी" म्हणून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले.





कार्यक्रमावेळी शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मनपूर्वक अभ्यास करण्याचे आवाहन करत आगामी दिपावलीच्या शुभेच्छाही देण्यात आल्या.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले आणि पूरानंतरच्या काळोखात आशेचा दिवा प्रज्वलित झाला.

# अन्यत्याग आंदोलनांची दखल प्रशासन घेईना; आंदोलकांची प्रकृती बिघडली

**जात प्रमाणपत्रासाठी 5 दिवसापासून उपोषण**

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय याठिकाणी मतदार संघातील महादेव कोळी समाजातील अनेक कुटुंब जात प्रमाणपत्र मिळण्यासाठी गेल्या ५ दिवसांपासून उपोषण करत असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष असून गेल्या दोन दिवसांपासून आंदोलकांनी अन्नत्याग आंदोलन सुरू केले असून अनेक आंदोलनाची प्रकृती बिघडली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून महादेव कोळी समाजाला जात प्रमाणपत्र मिळत नाही ते प्रमाणपत्र मिळावे आणि त्याचा वापर करता यावा यासाठी येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय समोर गेल्या पाच दिवसापासून समाजाच्या वतीने लोकशाही मार्गाने उपोषण करण्यात येत आहे.

### उपविभागीय अधिकारी रजेवर

➤ पाच दिवस महादेव कोळी समाज त्यांच्या कार्यालयासमोर उपोषण करत असून उपोषणाची व्याप्ती वाढत असून जवाबदार अधिकारी मात्र रजेवर गेले आहेत.

### आमदारांच्या आदेशाला केराची टोपली

➤ महादेव कोळी समाजाचे जात प्रमाणपत्र वाटप करा असे आदेश आ .प्रकाश सोळंके यांनी उपविभागीय अधिकारी यांना प्रत्यक्ष सांगितले असताना त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवण्याचे काम होत असल्याचा आरोप होत आहे.





### उपोषण दडपण्याचा प्रयत्न

➤ आमच्या जातीचे प्रमाणपत्र हे आमचा हक्क आहे ते मिळण्यासाठी आम्ही लोकशाही मार्गाचा अवलंब करून उपोषण उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर गेल्या पाच दिवसापासून करत असून प्रशासन मात्र उपोषण दडपण्याचा प्रयत्न करत आहे .असा आरोप उपोषणकर्ते करत आहेत.

मुंडण करून झोपलेल्या प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न देखील यावेळी उपोषण स्थळी करण्यात आला तर बहिऱ्या झालेल्या याच प्रशासनाला जागे करण्यासाठी बोबाबोंब देखील करण्यात आली पण प्रशासन सदरील महादेव कोळी समाजाच्या आंदोलनाची दखल घेण्यास तयार नाही असा आरोप उपोषणकर्ते करत आहेत.

वारंवार विनंती अर्ज करून देखील मागणीकडे दुर्लक्ष होत असल्याने दोन दिवसांपासून अन्नत्याग आंदोलन देखील सुरू झाले असून यात अनेक उपोषणकर्ते यांची प्रकृती बिघडली असून त्यांच्या जीवाचे काही बरे वाईट झाले तर त्यास सदरील प्रशासन जवाबदार असेल असा सूर उपोषणकर्ते करत आहेत.

# लिंबागणेश सर्कलमधून काँग्रेसचे आकाश मस्के-निवडणुकीच्या रिंगणात उतरणार

**सर्वसामान्यांच्या बळावर बांधणार विजयाची मोट**

➤ **बीड : प्रतिनिधी**

युवक काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आकाश मस्के–पाटील यांनी आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत लिंबागणेश सर्कल मधून काँग्रेस पक्षाकडून उमेदवारीची इच्छा जाहीर केली आहे.



### खंबीरपणे उभे राहिलेले नेतृत्व

गेल्या काही वर्षांपासून पक्षाच्या प्रत्येक चढ–उतारात निष्ठेने काँग्रेससोबत खंबीरपणे उभे राहिलेले आकाश मस्के–पाटील हे काँग्रेस च्या राष्ट्रीय नेत्या खासदार रजनीताई अशोकराव जी पाटील, प्रदेश सरचिटणीस, प्रदेश सरचिटणीस कुणाल दादा राऊत, बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहेत.

### विश्वासार्ह नेतृत्व; दांडगा जनसंपर्क

विविध सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर विशेषत: एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आंदोलनं उभी करून युवकांमध्ये विश्वासार्ह नेतृत्व निर्माण केले आहे .लिंबागणेश सर्कलमध्ये त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. युवकांपासून शेतकरी, मजूर आणि वंचित समाजातील प्रश्नांवर आक्रमक भूमिका घेणारे नेते म्हणून त्यांची ओळख आहे. नेहमी मैदानात उतरून प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये मस्के–पाटील यांचं नाव अग्रभागी घेतलं जात आहे. सध्या लिंबागणेश सर्कलमध्ये काँग्रेस पक्षाच्या उमेदवारीसाठी आकाश मस्के–पाटील यांचं नाव चर्चेत आहे. त्यांच्या उमेदवारीची अधिकृत घोषणा लवकरच होण्याची शक्यता असून, पक्ष कार्यकर्त्यांमध्ये या बाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# मैदानी क्रीडा जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये माध्यमिक विद्यालय पिंपरखेड खेळाडूंचे घवघवीत यश

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा संकुल मैदान बीड, येथे सुरू असलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये माध्यमिक विद्यालय पिंपरखेड येथील विद्यार्थिनीने १४ वर्षीय वयोगट मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये मार्गदर्शक बी .आर .बोचरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट कामगिरी करत विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी निवड होण्याचा मान मिळवला आहे.

जिल्हा क्रीडा संकुल मैदान बीड येथे क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा परिषद बीड, जिल्हा क्रीडा अधिकारी



कार्यालय बीड, यांच्या संयुक्त विद्यमानाने जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल मैदान बीड या ठिकाणी दि १५/१०/२०२५ रोजी मैदानी क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेमध्ये माध्यमिक विद्यालय पिंपरखेड शाळेची विद्यार्थिनी कु .दरेकर आदिती संतोष हिने ८० मीटर हर्डल्स – द्वितीय येण्याचा मान मिळवला असून, तिची विभागीयस्तर स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

खेळाडूला मार्गदर्शक बी .आर . बोचरे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तिने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

माध्यमिक विद्यालय पिंपरखेड संस्थेचे अध्यक्ष प्रा. दत्ता वाळसकर, मु.अ .विनोद लांबूड, मगर व्ही. बी., शिंदे डी .एस. वायभट ए. एस., डोंगरदिवे ए.ए., चाळक के. ए., सरवदे व्ही .एल ., पवार डी .डी., तावरे एस .बी., राऊत ए .डी., श्रीमती फुलपगार एन .डि., श्रीमती गायवळ एम .जी. बोंबले बी .जी., शिंदे व्ही. बी., निपटे डी .एम., मात्रे एस. के., चादर एस .बी. सर्व कर्मचारी तसेच गावकरी यांनी स्वागत करून विभागीयस्तरीय स्पर्धेसाठी कु .दरेकर आदिती संतोष हिला शुभेच्छा दिल्या.

# माजलगावच्या श्रीहरी आहेरची इंडिगोमध्ये इंजिनियर म्हणून निवड

➤ **माजलगाव :प्रतिनिधी**

कोणत्याही क्षेत्रात आज माजलगावकर मागे नाहीत. बेट इंडिगो एअरलाईन्समध्ये एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर म्हणून श्रीहरी गोविंदराव आहेर याने उमटलेला ठसा प्रेरणादायी आहे. दरम्यान, श्रीहरीच्या हवाई झेपेबद्दल कौतुकाचा वर्षाव होत आहे. शहरातील सामान्य कुटुंबातून आलेला श्रीहरी गोविंदराव आहेर या तरूणाने आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर विमान देखभाल अभियांत्रिकी क्षेत्रात एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर बनून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. श्रीहरीने असोशिएट टेक्निशियन, ज्युनियर टेक्निशियन, टेक्निशियन अशी सर्व पायरी पार करत अखेर एअरक्राफ्ट मेन्टेनन्स इंजिनियर पदवी प्राप्त केली आहे. बुधवारी दिल्ली येथे झालेल्या




पदवी वितरण समारंभ कार्यक्रमात त्याला ही पदवी मिळवून श्रीहरी आहेर या तरूणाने माजलगावचा अभिमान वाढवला आहे. या कामगिरीबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. आपल्या या तेजस्वी प्रवासात त्याला एअरक्राफ्ट क्षेत्रातील प्रतिष्टित पीयर अवॉर्ड हा सन्मान देखील मिळाला आहे. हा पुरस्कार अत्यंत मेहनती आणि गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला जातो. श्रीहरीने तो आपल्या परिश्रम, शिस्त आणि निष्टेच्या बळावर मिळवला आहे. श्रीहरीचं बालपण अत्यंत सामान्य परिस्थितीत गेलं. त्याने इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण श्री सिध्देश्वर विद्यालय माजलगाव येथे केले व उर्वरित शिक्षण बंगलोर येथे केले. त्यांचे वडील वारकरी संप्रदायाशी जोडलेले असून त्यांनी भक्ती, प्रामाणिकपणा आणि संयम या संस्कारांनी कुटुंबाची जडण घडण केली. आर्थिक परिस्थिती आव्हानात्मक असतानाही श्रीहरीने हार मानली नाही; उलट प्रत्येक अडचणीला संधी मानून आपला मार्ग स्वत: घडवला. श्रीहरीचे दोन्ही बंधू आपल्या कार्यातून समाजात प्रेरणा निर्माण करत आहेत. एक भाऊ चैतन्य माजलगाव येथे संगीत शिक्षक म्हणून कार्यरत असून, दुसरे भाऊ सब्बिदानंद शिवचरित्र व्याख्याते म्हणून शिवरायांचे विचार लोकांपर्यंत पोहोचवतात. श्रीहरीला या दोन्ही बंधूंचे अतिशय मोलाचे मार्गदर्शन लाभल्यानेच त्याला यशाचे शिखर गाठता आले. अशा साध्या, धार्मिक आणि संस्कारी कुटुंबात वाढलेल्या श्रीहरीने मिळवलेलं हे यश म्हणजेच संघर्षातून अवकाशाला गवसणी घातली आहे

# कै.गंगाधर डाके यांच्या स्मृतिप्रित्यर्थ मोफत आरोग्य तपासणी शिबीर

➤ **माजलगाव :प्रतिनिधी**

तालुक्यातील डाके पिंपरी येथील प्रतिष्ठीत नागरिक कै. गंगाधर श्रीरंगराव डाके यांना दि. ५ ऑक्टोबर रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या गंगापुजनाच्या कार्यक्रमानिमीत्त दि .१८ ऑक्टोबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



तालुक्यातील डाके पिंपरी येथील गंगाधर डाके हे प्रगतशील शेतकरी म्हणुन सर्वपरिचीत होते तर मनमिळावु स्वभाव आणि सर्वांना मदतीसाठी नेहमीच पुढे असत. दि. ५ ऑक्टोबरला त्यांना देवज्ञा झाली असुन त्यांच्या गंगापुजनाच्या कार्यक्रमानिमीत्त डाके पिंपरी येथे दि. १८ ऑक्टोबरला सकाळी ९ ते दु. २ पर्यंत आरोग्य तपासणी करण्यात येणार असुन –हृदयरोग तज्ञ डॉ. राधाकिसन डाके, कान – नाक – घसा व कॅन्सर तज्ञ डॉ. लक्ष्मीकांत यादव, आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर येथील डोळ्यांचे तज्ञ, हाडांचे तज्ञ डॉ. अजयसिंह डाके हे तपासणी करणार आहेत. डाके पिंपरीसह पंचक्रोषीतील गरजु रूग्णांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन गोपाळ गंगाधर डाके, दिपक गंगाधर डाके यांचे वतीने करण्यात आले आहे.